# कुलाबा-वांद्रे-सीप्झ् 'मुंबई मेट्रो ३' आता इन्स्टाग्रामवर

स्वातंत्र्यदिनानिमित्त एमएमआरसीचं एक पाऊल पुढे

मुंबई , ऑगस्ट १६ , २०१८ : स्वातंत्र्य दिनाचं औचित्य साधून 'मुंबई मेट्रो ३' आता इन्स्टाग्रामवर दाखल झाली आहे . या महाप्रकल्पा - विषयी जनतेला अधिकाधिक माहिती आणि छायाचित्रं उपलब्ध व्हावीत हा यामागचा उद्देश आहे . सध्या 'मुंबई मेट्रो ३' फेसबुक आणि ट्विटर या सोशल मीडियाचा यथायोग्य वापर करत आहे .

या इन्स्टाग्राम उपक्रमाविषयी बोलताना एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या , "'मुंबई मेट्रो ३' विषयी नागरिकांना जास्तीजास्त माहिती देण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न करत असतो . त्यामुळे सर्वांचं मेट्रो ३ ला सहकार्य मिळतं . या दृष्टीने इन्स्टाग्राम हे एक पुढचं पाऊल आहे . त्यामुळे मुंबईकरांना आणि इतर नागरिकांना या प्रकल्पाविषयी आधिक सविस्तर अशी सचित्र माहिती उपलब्ध होईल."